डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेतील भाषणे : एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी.पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

संशोधक

औटे विनया भगवानराव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.कुंचलवाड डी.एम.

नागनाथ कॉलेज, औंढा (ना.)

ता.औंढा (ना.), जि. हिंगोली

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

जुलै २०२३

प्रस्तावना :-

भारतीय समाजजीवनात अनेक विचारवंत, संशोधक आणि समाजसुधारक निर्माण झालेले दिसून येतात. त्या प्रत्येक महान व्यक्तीने आपआपल्या सिद्धांतानुसार वेगळे तत्त्वज्ञान सांगितले आहे. खरे तर भारतीय समाजसुधारकांची खूप मोठी परंपरा या देशाला लाभलेली आले. त्यापैकी केवळ समाजसुधारक अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक होते. त्यांनी केलेल्या विविध चिंतनापैकी संविधान सभेतील त्यांच्या भाषणांचा चिकित्सक अभ्यास हा महत्त्वपूर्ण ठरतो. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेतील भाषणाद्वारे भारतीय समाजजीवनाचे जे चित्रण केलेले आहे, ते लक्षात घेता त्यांना या विचारातून अभिप्रेत असणारा भारत आणि भारतातील लोकशाही, जातिमूक्त, शोषणमूक्त समाज हवा होता. संविधान सभेतील भाषणावरून त्यांची तळागाळातील माणसाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तसेच देशाच्या लोकशाहीकडे आणि राष्ट्रवादाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिसून येतो. समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी त्यांची चाललेली तळमळ ही त्यांच्या संविधानसभेतील भाषणांवरून दिसून येते. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते. "जर मी कायदे बनविण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल तर मी त्यांचे पालन का करावे?" असा त्यांचा सवाल होता. त्यांच्या मते समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गाचा बनलेला असतो आणि म्हणूनच शासनात साऱ्या वर्गांना प्रतिनिधीत्त्व असावे जेणेकरून स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल असा त्यांचा आग्रह होता. भारतीय संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय, सामाजिक विचार हे लोकशाही शासन व्यवस्थेला बळकट करणारे ठरतात. याचे मुख्य कारण भारतामध्येही शोषक आणि शोषितांचा एक प्रमुख गट अस्तित्त्वात होता फक्त त्याला भयानक अशी सामाजिक विषमतेची जोड होती, तर लोकशाही पद्धतीप्रमाणे संपूर्ण समाज सामाजिक विषमता मुक्त करावयाचा होता.

इ.स. १९२४ सालापासून भारतीय समाज जीवनात ज्याप्रमाणे त्यांनी सामाजिक सुधारणेच्या चळवळी केल्या प्रमाणेच स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांनी राजकीय

जीवनात काही भूमिका घेतल्या. यापैकी काही भूमिकेच्या संदर्भात ते 'आग्रही' होते, म्हणून बाबासाहेब अनेकांच्या टीकेचे लक्ष्य बनले. त्यांनी घेतलेल्या भूमिकांपैकी काही त्यांच्या राजकीय डावपेचाचा भाग होत्या. तरीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे संविधान सभेतील विचार आजच्या काळात महत्त्वपूर्ण ठरतात. कोणताही महापुरुष हा त्याच्या कालखंडाचे अपत्य असतो. त्याचप्रमाणे तो आपल्या विचाराने, कर्तृत्त्वाने त्याच्या कालखंडावर आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवित असतो. महापुरुषांचा जसा कालौघात शारीरिक विकास होतो, तसा त्याच्या विचारांचाही विकास होत असतो, याचे भान प्रत्येक महापुरुषाच्या अनुयायांनी ठेवावयाचे असते. तसे झाले नाही तर बहुधा या महापुरुषाचा समावेश अवतारी पुरुषात होतो, त्याचे विचार वेदवाक्य व्हावे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न होतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूणच जीवनाच्या व त्यांच्या समग्र तत्त्वज्ञानाचा अभ्यास हा अभ्यासकाच्या कसोटीचा विषय आहे. कोणत्याही महापुरुषाने त्यांच्या आयुष्यात स्वीकारलेले विचार, मूल्ये आणि तत्त्वप्रणाली या स्थितीशी कधीच नसतात. संकल्पना, मूल्ये, तत्त्वप्रणाली यांना जसा इतिहास असतो, तशाचप्रकारे विकासही असतो. मूल्ये, विचार, विकासाकडे दुर्लक्ष करून त्यांच्या उगमावरच जोर देणारे अभ्यासक सुद्धा महापुरुषाला न्याय देऊ शकत नाहीत. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील भाषणे भारताच्या राष्ट्रवादासाठी आणि लोकशाहीसाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

इ.स. १९३० ते १९४० ही दहा वर्षे म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय दृष्टीला वास्तवाचा आधार शोधणारी वर्षे आहेत. या दशकात बाबासाहेबांनी स्वतःच्या मनाविरूद्ध, एक अपरिहार्य आपत्ती म्हणून, स्वतंत्र मतदारसंघ मागितला, तो गोलमेज परिषदेत मिळविला व गांधीजींच्या उपोषणानंतर पुणे करार करून सोडून द्यावा लागला. यानंतर इ.स. १९३५ च्या ऑक्टोबर महिन्यात येवला मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली. लाहोरच्या जातपात तोडक मंडळाच्या वार्षिक अधिवेशनासाठी तयार केलेले भाषण 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' 'जातीसंस्थेचा उच्छेद' या नावाने प्रसिद्ध केले. १९३६ सालच्या ऑगस्ट महिन्यात स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. दि. १७ सप्टें. १९३७ ला मुंबई विधिमंडळात शेतजमीन कसणाऱ्या

कुळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने खोती पद्धत नष्ट करण्यासाठी एक विधेयक मांडले. जमीनदारी विरूद्ध प्रत्यक्ष कृती करण्याचा भारतीय इतिहासातील बहुधा तो पहिलाच प्रयत्न असावा. १९३८ साली विधिमंडळात मांडल्या गेलेल्या औद्योगिक कलहाच्या विधेयकास त्यांनी कडाडून विरोध केला. मजूर वर्गाच्या विरोधी असणाऱ्या या काळ्या कायद्याविरूद्ध गिरणी कामगार युनियन आणि स्वतंत्र मजूर पक्ष यांनी एकत्रित येऊन कामगारांचा संप घडवून आणला. १९३९ साली महाडच्या शेतकरी परिषदेला मार्गदर्शन केले. १९४० साली त्यांचा पाकिस्तानवर लिहिलेला अभ्यासपूर्ण व विचारप्रवर्तक ग्रंथ प्रसिद्ध झाला. याच दशकात बाबासाहेब व्हॉईसरॉयच्या कौन्सिलमध्येही सामील झाले. त्यांच्या या विचारांवरून त्यांचे संविधान सभेतील भाषणे ही अर्थपूर्ण ठरतात. त्यांची राजकीय जडणघडण ही वरील विचारांतून घडताना दिसते.

इ.स. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय सभेने' ब्रिटिश सरकारकडे संघटितपणे राजकीय हक्कांची मागणी करण्यास सुरुवात केली. इ.स. १८९१ मध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटने केलेल्या कायद्यानुसार प्रथमच हिंदी लोकांना स्थानिक संस्थेतर्फे कायदे मंडळात प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क मिळाला. इ.स. १९०९ च्या मोर्लेमिंटो सुधारणा कायद्यानुसार भारतीयांना राजकीय सुधारणांचा जो दुसरा हप्ता दिला, त्यानुसार जातीय तत्त्वानुसार राजकीय हक्क देण्याचे तत्त्वतः मान्य केले. त्यामुळे मुसलमान व अँग्लो इंडियन लोकांना राजकीय हक्क मिळाले, परंतु या कायद्यामध्येही अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासंबंधी काहीच विचार करण्यात आला नाही. कारण हिंदू समाजव्यवस्थेत अस्पृश्य जातींना स्वतंत्र अस्तित्त्वच नसल्याने ब्रिटिश सरकारलादेखील त्यांच्या राजकीय हक्कासंबंधी विचार करण्याची गरज भासली नाही. पहिल्या जागतिक महायुद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा परिणाम म्हणून ब्रिटिश सरकारला भारतीयांना राजकीय हक्क देण्याची गरज भासली. म्हणून ब्रिटिश पार्लमेंटने भारताच्या राजकीय स्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी इ.स. १९१९ मध्ये साऊथबरो समितीची नेमणूक केली. तत्पूर्वी इ.स. १९१७ च्या माँटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणांच्या अनुषंगाने साऊथबरो समिती भारतात आली होती. भारतातील प्रमुख शहरांना भेटी देऊन या समितीने हिंदी प्रतिनिधींची

साक्ष घेऊन माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस राजकीय बाबतीत पुरोगामी समजले जाणारे पुढारी स्वराज्याची मागणी करीत होते; परंतु अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्त्व देऊ नये, त्यांचे राजकीय हितसंबंध हिंदू प्रतिनिधींच्या हातीच सुरक्षित राहतील अशी भलावण करीत होते. याचा अर्थ अस्पृश्यांना राजकीय हक्क देण्याच्या बाबतीत ब्रिटिश सरकार उदासीन होतेच, परंतु पुरोगामी स्पृश्य हिंदू देखील अस्पृश्यांच्या विरोधी होते. तत्कालीन घडणाऱ्या या सर्व घडामोडींकडे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ.भीमराव आंबेडकरांचे बारकाईने लक्ष होते. राजकीय बाबतीत क्रांतिकारक; परंतु सामाजिक आणि धार्मिक बाबतीत प्रतिगामी असणाऱ्या अशा प्रवृत्तींविरूद्ध १६ जानेवारी १९१९ च्या 'मुंबई टाईम्स' च्या अंकात - 'A Mahar on Home Rule' असा मथळा असलेले पत्रक प्रसिद्ध करून आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "स्वराज्य हा जसा ब्राह्मणांचा जन्मसिद्ध हक्क आहे तसाच तो महारांचाही आहे, ही गोष्ट कोणीही मान्य करील. यास्तव पुढारलेल्या वर्गांनी दलितांना शिक्षण देऊन त्यांच्या मनाची आणि सामाजिक दर्जाची उंची वाढविणे हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. जोवर हे होणार नाही तोवर भारताच्या स्वराज्याचा दिन बराच दूर राहणार हे निश्चित!" अद्यापपावेतो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याला सक्रीय सुरुवात झालेली नव्हती. तरी तत्कालीन राजकीय घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून असलेल्या तरूण आंबेडकरांनी वयाच्या २८ व्या वर्षी जी भूमिका जाहीर केली, त्यावरून भविष्यात त्यांची स्वराज्यवाद्यांशी खडाजंगी होईल असे स्पष्ट दिसून येते.

थोडक्यात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची संविधान सभेतील भाषणे ही वरील पार्श्वभूमीला धरून दिसतात. त्यांनी संविधान सभेत मांडलेले विचार हे वरील कार्यातूनच दिसून येतात. ब्रिटिश भारतापासून स्वतंत्र भारतापर्यंत त्यांनी केलेले कार्य हे त्यांच्या संविधान सभेतील भाषणात स्पष्ट दिसतात.

पुढे १९३६ साली देशामध्ये पहिलीच निवडणूक संपन्न झाली. त्यावेळच्या मध्यप्रांत आणि वऱ्हाड व इतर प्रांतातील मुंबई ईलाख्यातील निवडणुका लढवण्यासाठी वरील पक्ष

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केला होता. याच पार्श्वभूमीवर पुढे अल्पसंख्याकांना राजकीय हक्काच्या संरक्षणाची जेवढी निकड नाही तेवढी ती अस्पृश्य वर्गाला आहे हे कारण पुढे करून, भारतातील अस्पृश्य वर्ग शैक्षणिकदृष्टीने उपेक्षित असल्याने तसेच आर्थिकदृष्ट्या गरीब असल्यामुळे व सामाजिकदृष्ट्या गुलामीत असल्याने तसाच तो राजकीयदृष्ट्या कमकुवत आहे. हे ओळखून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या राजकीय सुरक्षिततेची मागणी गोलमेज परिषदेमध्ये केली. याच पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी भूमिकाही मांडल्या. या पाठीमागे त्यांचे मुख्य सुत्र होते ते म्हणजे अस्पृश्य लोकांचे कल्याण. इ.स. १९३२ मध्ये जातियनिवाडा जाहीर झाल्याने अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र मतदार संघ मिळाला. या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीला महात्मा गांधीजीने विरोध केला होता. या संदर्भात सॅम्युअल होअर असे म्हणतात की, "स्वतंत्र मतदार संघाचा विचार राजकीय दृष्टीतून कसाही असला तरी अस्पृश्यांच्या आणि हिंदुधर्माच्या दृष्टीने विघातक आहे." २० सप्टेंबर १९३२ रोजी गांधीजींनी या संदर्भात प्राणांतिक उपोषण सुरू केले. त्याची परिणती पुढे पुणे करारात झाली; परंतु, अस्पृश्य वर्गाचे स्वतंत्र राजकीय अस्तित्त्व मान्य करावे लागले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाचे नेतृत्त्व केले हेही मान्य करावे लागते. जातियनिवाड्याने अस्पृश्य वर्गांना प्रारंभी ७१ जागा दिल्या होत्या, त्याची संख्या पुणे करारामध्ये १५१ झाली. १९३६ सालच्या ऑगस्ट महिन्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. जातिव्यवस्था आणि शोषणव्यवस्था यांच्याविरूद्ध झुंज देणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 'स्वतंत्र मजूर पक्षा'नंतर 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' स्थापण्याचा निर्णय घ्यावा लागला.

भारताचे संविधान हे संविधान सभेच्या माध्यमातून अस्तित्त्वात आले आहे. या संविधान सभेचा प्रस्ताव कॅबिनेट मिशन मंत्रिमंडळ योजनेद्वारे दि. १९.०२.१९४६ रोजी घोषित करण्यात आला होता. २० ऑगस्ट १९१७ साली ब्रिटिश सरकारने भारताला क्रमाक्रमाने स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली. याबाबत मोंटग्यू-चेम्सफोर्ड अहवाल १९१८ साली प्रसिद्ध झाला व भारतीयांना राज्य शासनात स्थान मिळू लागले. त्याचबरोबर भारताकरिता वेगळै संविधान तयार करण्याची मागणी सुद्धा जोर धरू लागली. १९२८ साली काँग्रेसद्वारे श्री

मोतीलालजी नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली "नेहरू घटना समिती" स्थापन करण्यात आली. या समितीने तयार केलेल्या संविधानाचा आराखडा अस्पृश्य, मुसलमान व मागासवर्गीय नेतृत्वाने नाकारला. हिंदू, मुसलमान, अस्पृश्य, शीख व अन्य अल्पसंख्यांक भारतीय यांना मान्य होईल अशी घटना किंवा संविधान तयार करणे जिकीरीचे झाले. १९३७ सालच्या काँग्रेस अधिवेशनात काँग्रेसने वयस्क मताधिकाराने निवडून आलेल्या भारतीय संविधान सभेद्वारेच भारताचे संविधान म्हणजेच राज्यघटना तयार केली जावी, असा ठराव पारीत केला. तिकडे १७-१८ सप्टेंबर १९३९ रोजी अखिल भारतीय मुस्लिम लिगने ब्रिटिश सरकारला एका प्रस्तावाद्वारे आश्वासन मागितले की, मुस्लिम लिगच्या संमतीशिवाय भारताच्या संविधान निर्मितीबाबत कोणतीही घोषणा केली जाऊ नये, काँग्रेसने पुन्हा रामगढ अधिवेशनात मार्च १९४० मध्ये संविधान सभेची मागणी केली. १९४२ साली जेव्हा सर स्टेफर्ड क्रिप्स भारतात आले तेंव्हा भारतातील संवैधानिक समस्येच्या समाधानाकरिता त्यांनी मांडलेल्या योजनेला क्रिप्स योजना म्हणतात. क्रिप्स योजना इतकी अव्यावहारिक होती की, कोणत्याही पक्षाने तिला स्वीकृती दिली नाही. या सर्व घडामोडीबाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण "दी कम्युनल डेडलॉक अँड वे टू साल्व ईट" हे फार महत्त्वाचे आहे. १९ सप्टेंबर १९४५ रोजी नवनियुक्त लॉर्ड वेवेल यांनी घोषणा केली. सरकार शक्य तितक्या लवकर संविधान सभेचे गठन करू इच्छिते. परंतु त्या आधी केंद्रीय विधीमंडळ व प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणुका झाल्यास लोकांचा कल लक्षात येईल. त्याप्रमाणे १९४५-४६ दरम्यान केंद्रीय व प्रांतिय विधीमंडळाच्या निवडणुका संपन्न झाल्यात. काँग्रेसला ८ प्रांतात पूर्ण बहुमत मिळाले. मुस्लीम लिग देखील एक मोठी राजकीय शक्ती म्हणून उदयास आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानसभेतील निवडीसंदर्भात प्रदीप गायकवाड लिहितात, "डॉ.आंबेडकर हे संघ संविधान समितीचे सदस्य होते. या समितीचा अहवाल संविधान सभेच्या अध्यक्षांना समितीचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ४ जुलै १९४७ रोजी सादर केला. डॉ.आंबेडकरांनी विविध समित्यांवर जे कार्य केले ते अत्यंत उपयोगी व मोलाचे मानले गेले आणि काँग्रेसच्या नेत्यांनी नि:संकोचपणे खात्री पटली की डॉ.बाबासाहेब

आंबेडकरांच्या सेवा घेतल्याशिवाय स्वातंत्र्याचे दृढीकरण आणि विधीनियमीकरण सहज सुलभ होणार नाही. बंगालच्या विभाजनाचा परिणाम म्हणून डॉ.आंबेडकर संविधानसभेचे सदस्य राहिले नाही. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईचे तत्कालिन मुख्यमंत्री श्री बी.जी.खेर यांना पाठविलेल्या ३० जून १९४७ च्या पत्रात श्री डॉ.आंबेडकरांची संविधान सभेवर त्वरीत निवड व्हावी असे सुचविले."

संविधान सभेची पहिली बैठक दि. ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाला अंतीम रूप देण्यात आले. दि.२४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेच्या सदस्यांनी संविधानाच्या प्रतीवर सह्या केल्या व सभेचे कामकाज संपुष्टात आले. त्यामुळे संविधान सभेचा कार्यकाळ हा ९ डिसेंबर १९४६ ते २४ जानेवारी १९५० असा समजला जातो. २५ नोव्हेंबर १९४६ पर्यंत संविधान सभेचे कार्य दोन वर्ष, अकरा महिने आणि सतरा दिवस पर्यंत चालले. या कालावधीत संविधान सभेची ११ सत्रे व १६५ बैठका संपन्न झाल्या. २२ नोव्हेंबर १९४९ पर्यंत संविधानावर ६३,९६,७२९ रूपये खर्च झाला होता. संविधान निर्माण प्रक्रियेचे दर्शकदिर्घेतून सुमारे ५३,००० दर्शकांनी अवलोकन केले. एकूणच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेतील भाषणे ही देशाच्या उभारणीसाठी लोकशाहीची पाळेमुळे रोवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांच्या भाषणांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे.

संशोधन समस्या :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राजकारणासंदर्भाने जे विवेचन केलेले आहे, ते आजमितीस परिपूर्ण उपयुक्ततावादी ठरलेले आहे. अशाही वातावरणात वर्तमानकाळाचा संदर्भ घेत असताना, अलिकडील काळात राजकारणामध्ये झालेले बदल, झालेले परिवर्तन हे लोकशाहीसाठी काही प्रमाणात घातक किंबहुना संप्रदायवादी विचारांनी घेतलेली उचल ही काहीअंशी प्रमाणात चिंतेची बाब ठरलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेले राजकारण दुर्दैवाने आजमितीस परिपूर्ण झालेले दिसत नाही. आजच्या स्थितीत

राजकारणात पारदर्शकता दिसत नाही. नव्हे तर निवडणुकीच्या काळात प्रत्येक राजकीय पक्ष हा आपला जाहीरनामा प्रसिद्ध करतो, दलितांना-वंचितांना-अस्पृश्यांना अनेक अमिषे, सोई-सवलती जाहीर केल्या जातात. सत्तेवर आल्यानंतर मात्र त्याकडे पूर्णतः कानाडोळा केल्या जातो. साधारणपणे ही प्रक्रिया सर्वच राजकीय पक्षांमध्ये आलेली आहे. स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये अशाप्रकारची राजकीय प्रक्रिया घडत असताना दिसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र पूर्णतः आदर्शवाद, पारदर्शकता, निवडणुकीची योग्य अंमलबजावणी, निर्णय प्रक्रिया आणि समाजहित हीच भूमिका समोर ठेवली होती. बाबासाहेब आंबेडकरांसारखे विचार, त्यांचे निर्णय, त्यांनी केलेले राजकारण आज मात्र पूर्णतः भारतीय पातळीवर झालेले दिसत नाही. त्यामुळेच आज राजकारणामध्ये नैतिकता, विश्वासार्हता हरवलेली दिसते. त्यामुळे लोकशाहीच्या यशस्वीतेसाठीसुद्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान सभेतील भाषणे कसे महत्त्वपूर्ण आहेत हीच या संशोधनाची समस्या आहे.

संशोधन विषय निवडीचे महत्त्व -

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ सामाजिक समतेचे पुरस्कर्ते नव्हते तर आर्थिक समता ही त्यांना अभिप्रेत होती. खऱ्या अर्थाने सैद्धांतिक पातळीवर अभ्यास करून संविधान सभेतील भाषणांचा अभ्यासासंदर्भातील महत्त्व हे लोककल्याणासाठी कशाप्रकारचे महत्त्वपूर्ण ठरते व त्याचा उपयोग कसा होतो? दबलेल्या रंजलेल्या गांजलेल्या वर्गातील लोकांना एक करून राजकीय सत्तेत सहभाग कसा नोंदविता येईल? या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान सभेतील भाषणांचा चिकित्सक अभ्यास भारतीय जनमानसाच्या संबंधाने व राष्ट्र उभारणीसाठी समर्थ ठरणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय लोकशाही, राष्ट्रवाद तसेच दीन-दलितांचे शोषण याकडे समाजाचे लक्ष वेधून केवळ आहेरे-नाहीरे वर्ग नसून दीन-दलितांचा एक वेगळाच वर्ग अस्तित्त्वात असून, ज्यांचे राजकीय, पारंपरिक, सांस्कृतिक या सर्वार्थाने खच्चीकरण व शोषण कशा प्रकारे झाले हे स्पष्ट केले. या संदर्भाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील भाषणांचा चिकित्सक अभ्यास करणे

हे या संशोधनाच्या संदर्भाने महत्त्वपूर्ण ठरते. या सर्वांचा आढावा या संशोधन कार्यातून घेतला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये -

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांचा वेध करणे.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मितीच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत दिलेल्या विविध भाषणांचा अभ्यास करणे.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधानाचा अभ्यास करणे.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकशाही राष्ट्रवाद अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके -

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व राजकीय विचार संविधान निर्मितीस कारणीभूत आहेत.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान निर्मितीतील योगदान महत्त्वाचे आहे.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समताधिष्ठित संविधान निर्मितीसाठी संविधान सभेत विविध भाषणे केली आहेत.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधान देशाच्या एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण आहे.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकशाही राष्ट्रवाद संविधानाच्या निर्मितीस सहाय्यक ठरला आहे.

व्याप्ती आणि मर्यादा -

प्रस्तुत संशोधन हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत दिलेल्या भाषणांशी संबंधित असल्या कारणाने त्यांचे संविधान सभेतील भाषणे तसेच संविधान निर्मितीतील योगदान, सामाजिक आणि राजकीय कार्य एवढ्यापुरतेच मर्यादित असणार आहे ही या संशोधनाची व्याप्ती आहे. परंतु वर्तमानातील भारतासमोर ज्या असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत त्यामुळे भारतीय एकात्मतेला व अखंडतेला धोका निर्माण झाला आहे. तेंव्हा प्रस्तुत संशोधनातून प्रभावी उपाययोजना मांडली जाणार आहे ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन पद्धती -

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील भाषणे : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय घेऊन प्रस्तुत संशोधनाची मांडणी करण्यात येणार आहे. सर्वसाधारणपणे समाजशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या संशोधन पद्धतीचा व राजकीय विचारवंतांच्या वैचारिक लेखनाचा आधार मूळ स्त्रोत घेतला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक पद्धतीचा स्वीकार केला जाणार आहे. प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केल्या जाणार आहे. हा प्रबंध वर्णनात्मक शैलीचा असून त्यात अभ्युपगमाच्या सिद्धतेसाठी तार्कीक निगमन व विगमन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. काही प्रमाणात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा देखील वापर केल्या जाणार आहे.

प्रकल्प आराखडा -

सबंधित संशोधन कार्य निष्कर्षाप्रत नेण्याच्या दृष्टीने, तसेच संशोधन अधिकाधिक शास्त्रशुद्ध होण्यासाठी शोधप्रबंधामध्ये पुढीलप्रमाणे सैद्धांतिक स्वरूपात प्रकल्प आराखडा केला आहे.

प्रकरण पहिले : विषयप्रवेश

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात विषयाच्या निवडीमागची भूमिका, अभ्यास विषयाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, संशोधन समस्या, गृहितके, संशोधन पद्धती, तथ्यसंकलन, संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती, संकल्पना स्पष्टीकरण, संशोधन साहित्याचा आढावा, अहवालाचा आराखडा (संशोधन आराखडा) इ. घटकांचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर : लोकशाही व राष्ट्रवाद

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबडकर यांच्या राष्ट्रवादी विचारांवर पडलेला प्रभाव तसेच त्यांचे लोकशाही विषयक विचारांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये आणि त्यांचे राष्ट्रवादाविषयक विचार यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मिती

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेवर झालेली निवड, संविधान सभेची पार्श्वभूमी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान निर्मितीची प्रक्रिया याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान सभेतील विविध भाषणे

प्रस्तुत प्रकरणात डॉ.बाबासाहेब आंबडकर यांच्या संविधान सभेतील भाषणांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संविधान सभेतील वादविवाद, त्यांच्या भाषणातील समताधिष्ठित समाज निर्मितीचे मूळ शोधणे, राष्ट्र उभारणी आणि संविधान सभेतील भाषणे यांचा अभ्यास करणे.

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात संशोधनाचा आढावा घेऊन सारांश व निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. तसेच गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात येणार आहे.

संदर्भग्रंथसूची :-

१) गायकवाड प्रदीप (संपा.), 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे खंड २', क्षीतिज पब्लिकेशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, ६ डिसेंबर २०००.

२) दया पवार (नियंत्रक), प्रा.केशव मेश्राम, प्रा.बा.ह.कल्याणकर, वामन निंबाळकर, डॉ.एस.एस.भोसले, हरि नरके, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १५ डिसेंबर १९९३.

३) कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १ ऑगस्ट १९८५.

४) सबनीस श्रीपाद, 'भारतीय प्रबोधन आणि नव आंबेडकरवाद', मधुराज पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ मार्च, १९९२.

५) निकुंभे सी.एच., 'दलितांनी शासनकर्ते व्हावे', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, मार्च २०१४.

६) दीक्षित अनिल, 'भारतीय लोकशाही : शाप की वरदान', नंदिनी पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट २०१४.

७) पवार ज.वि., 'भारतीय काँग्रेस आणि आंबेडकरी चळवळ', अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, मार्च २००२.

८) लिंबाळे शरणकुमार, 'प्रज्ञासूर्य', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १० जून, १९९१.

९) हि.गो., लोखंडे भाऊ, 'डॉ.आंबेडकरी हितशत्रुंच्या जाणिवा', पारिजात प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १३ ऑगस्ट २०१२.

१०) धांडे भगवान, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन नेतृत्त्व', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २६ जुलै २००५.

११) तांबे श्रुती, 'पुरोगामितत्त्व', लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई, प्रथम आवृत्ती, मे २००२.

१२) आंबेडकर बाळासाहेब, 'बहुजन चळवळ विचारसरणी आणि पक्ष संघटना', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, ६ डिसेंबर २००३.

१३) देशमुख अलका, 'बदलते समाजकारण आणि राजकारण', साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २० सप्टेंबर, २०१०.

१४) सरदार बाळकृष्ण, 'गांधी आणि आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणे, ३०, प्रथम आवृत्ती, ६ डिसेंबर, १९८७.

१५) कऱ्हाडे सदा, 'मार्क्सवाद, बुद्धवाद आणि आंबेडकरवाद', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, १ मे २०१०.

१६) बनहट्टी श्यामकांत श्रीनिवास (संपा.), "समाजप्रबोधन", सुविचार प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६६.

१७) तुपे सु.दा., "डॉ.बाबासाहेब आंबेडकर व जमीन धारणा", डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पहिली आवृत्ती, २५ डिसेंबर, १९९३.

१८) लोखंडे भाऊ, "आंबेडकरी क्रांतीचे सिंहावलोकन", लोकराज्य, रौप्य महोत्सवी वर्ष, ऑक्टोबर, २००६.

१९) इनामदार एन.आर., पुराणिक एस.एन., "राजकीय समाजशास्त्र", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९८४.

संशोधक
औटे विनया भगवानराव

मार्गदर्शक
प्रा.डॉ. कुंचलवाड डी.एम.
नागनाथ कॉलेज, औंढा (ना.),
ता.औंढा (ना.), जि.हिंगोली